
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५७ वे, अंक १ला, मुंबई । मार्च २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 1, Mumbai I March 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



**या देवी सर्व भूतेषु । मातृ रुपेण सस्थिता ।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै । नमस्तस्यै नमो नमः ।।**




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५७वे, अंक १ला,
मार्च २०२४
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९


**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in





**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाची सोलापूर येथे संलग्न संस्था प्रतिनिधींची बैठक**



**देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, नाशिक येथील राज्यस्तरीय भजन स्पर्धा**



**सोलापूर दे.ऋ.ब्रा.चा कै. काकडे स्मृती पत्रकार पुरस्कार अश्विनी तडवळकर यांना सुपूर्द**


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

Best Wishes From

Reg. No. AR3/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357


**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**

**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100




**Ajay A. Sunalkar**
Chairman

### AKSHAY DEPOSIT*

| | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |

Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years)



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

### BOARD OF DIRECTORS

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)

Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

# कार्याध्यक्षांचे मनोगत

सर्व माता-भगिनींना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. दि. ८ मार्च रोजी पार पडलेल्या महिला दिनानिमित्त आपल्या अनेक संलग्न संस्थांच्या महिलांनी भव्यप्रकारे साजरा करून समाजाला स्त्री शक्तीची व स्त्री कार्याची प्रचिती करून दिली आहे. आपल्या देशाचे लाडके प्रंतप्रधान यांनी भारताच्या नारी शक्तीची जाण ठेवून 'बेटी बचाव, बेटी पढाव', 'लाडली बेटी', तसेच नारी शक्ती वंदन या अभिनव उपक्रमाअंतर्गत आपल्या नारी शक्तीचा सन्मान केला आहे. पूर्वी ज्या क्षेत्रामध्ये मुख्यतः संरक्षण, हवाई, व्यवस्थापन, अर्थकरण, बँकींग, उद्योग, नवउद्योग यामध्ये महिलांचा सहभाग नव्हता. या सर्व विभागात महिलांच्या कार्याची व त्यांच्या उत्कृष्ठ गुणाची पारख ठेवून त्यांची उच्च पदावर नेमणूक केली आहे.

मध्यवर्ती मंडळ व आपल्या संलग्न संस्था महिलांची शक्ती त्यांच्या अंगी असलेले गुण व हुशारी यांचा विचार करून ३० टक्के प्रतिनिधित्व दिले आहे व आपल्या सर्वांचा नेहमीच हाच प्रयत्न असतो की, महिलांनी जास्तीत जास्त उपक्रमात भाग घेऊन आपल्या समाजाचा त्यांचाकरवी उत्कर्ष व्हावा. आपल्या सर्वांना माहित आहे की, सौ. सुधा मूर्ती म्हणजेच Infosys या कंपनीचे संस्थापक श्री. नारायण मूर्ती यांच्या पत्नी व ब्रिटनचे पंतप्रधान श्री. ऋषी सूनाक यांच्या सासूबाई सौ. सूधा मूर्ती या मूळच्या कुलकर्णी आहेत व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण आहेत याचा आपल्या सर्वांना सार्थ अभिमान असावा त्यांच्या व्यतिरिक्त आपल्या देशस्थ ऋग्वेदी महिला अनेक क्षेत्रात आघाडीवर आहेत. उदा. श्रीम. प्रिया कवठेकर, सौ. अलका कुलकर्णी, सौ. सरोज मेकल तसेच प्रसिद्ध शिक्षणतज्ञ सौ. कांचन तारे, इंदोर, समाजसेविका माधवी मोगरकर, बडोदा, सौ. रोहिणी तडवळकर सोलापूर, सौ. केतकी कुलकर्णी पूणे अशा आपल्या अनेक भगिनी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात उत्कृष्ठ काम करीत आहेत.

संलग्न संस्थांना विनंती की, आपआपल्या क्षेत्रातील उत्कृष्ठ कामगिरी बजावलेल्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण भगिनिंची माहिती आम्हाला कळविल्यास त्यांच्या कार्याला आमच्या 'समाचार' पत्रिकेत प्रसिद्धी देऊन त्यांचा गौरव करण्याचा प्रयत्न करू. पुनःश्च नारी शक्तीला त्रिवार वंदन.

# दि. १८.०२.२०२४ रोजी संलग्न संस्था प्रतिनिधींची सोलापूर येथे पार पडलेली सभा

दि. १८.०२.२०२४ रोजी १० वर्षानंतर सर्व संलग्न संस्थांची बैठक सोलापूर येथे संपन्न झाली. या सभेला मुंबई, ठाणे, मुलुंड, कल्याण, पूणे, नाशिक, बडोदा, सोलापूर, लातूर, अकोला, बेळगाव, नांदेड, भुसावळ, मंगळवेढा, मोहोळ, छत्रपती संभाजी नगर येथील एकूण ६५ संलग्न संस्था प्रतिनिधी उपस्थित होते. या सभेत अनेक मान्यवरांनी संलग्न संस्थांच्या परस्पर सहकार्यावर भर दिला. तसेच एकमेकांच्या सहाय्याने संयुक्त उपक्रम कसे राबविता येतील यावर विचार झाला. कळविण्यास आनंद वाटतो की, नाशिक संस्थेने छत्रपती संभाजी नगर येथे एप्रिल होणाऱ्या ५ सामाजिक व्रतबंधनाचा खर्च देण्याचे कबूल केले आहे. तसेच मध्यवर्ती मंडळातर्फे या उपक्रमास रु. १०,००० ची देणगी देण्यात आली आहे. दुसरी आनंदाची गोष्ट म्हणजे विभागावर संम्मेलन घेऊन त्या त्या विभागातील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांचे एकत्रीकरण करण्याविषयी चर्चा झाली व त्यानुसार श्री. मधुकर कुलकर्णी, लातूर कार्यवाह यांनी एप्रिल महिन्यामध्ये मराठवाडा विभागामध्ये सम्मेलन घेण्याचे जाहिर केले. ज्याला नांदेड प्रतिनिधीनी पाठिंबा दिला.

पुणे संस्थेच्या प्रतिनिधींनी सभेस सांगितले की, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था पूणे ही त्यांची शतक महोत्सवी वर्ष साजरे करत आहेत व त्या निमित्त होणाऱ्या उपक्रमांना व समारंभांना सर्व समाजबांधवांनी व बंधूनी त्यांचा सहभाग नोंदवावा जेणेकरून हा महोत्सव भव्य दिव्य साजरा होईल. या महोत्सवाअंतर्गत होणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती लवकरच सर्व संस्थांना कळविण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

बडोदा संस्थेने परिषदे नंतरच्या एक वर्षात त्यांनी केलेल्या सर्व उपक्रमांची माहिती सभेला देतांना सांगितले की, त्यांच्या सभासद संख्येत २५० च्या वर वाढ झाली असून संस्थेच्या प्रत्येक समारंभात १५० च्या वर सभासद उपस्थित असतात व अनेक समाजातील दानशूरांकडून त्यांना चांगल्या देणग्या प्राप्त होत आहेत. जेणेकरून बडोदा संस्थेची आर्थिक बाजू भक्कम होत आहे. व लवकरच बडोदा संस्थेची स्वतःची भव्यदिव्य वास्तू निर्माण होण्याचे स्वप्न साकार होणाच्या मार्गावर आहे.

मध्यवर्ती मंडळातर्फे सर्व संलग्न संस्था प्रतिनिधींचे व खास करून सोलापूर संस्थेचे त्यांनी केलेल्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आभार मानण्यात आले व सर्वांन आश्वसित करण्यात आले की मध्यवर्ती मंडळा आपल्यामागे नेहमीच खंबीरपणे उभे राहून आपल्या कार्यास यथोचित सहभाग करेल. कारण आपल्या सर्वांची एकच इच्छा आहे की, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा ज्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करणे ही काळाची गरज आहे. सर्व संलग्न संस्था प्रतिनिधीचे व सोलापूर संस्थेचे आभार मानून सभेची सांगता झाली.

## स्त्री शक्तीचा गौरव करणारे समर्थ रामदास स्वामी

**स. भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

महाराष्ट्रात संत परंपरा आहे त्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण पण दुर्मिळ संत म्हणजे समर्थ रामदास स्वामी होय. श्री समर्थांनी अनेक प्रकारच्या गोष्टींवर आपले विवेचन त्यांच्या साहित्यातून मांडले आहे. ते इतके अफाट व विस्तृत आहे की आधुनिक काळातील गुगलची मदत घेऊनही कोणी इतक्या विषयावर इतके सविस्तर लिहू शकणार नाही. सर्व विषयांचा गाढा अभ्यास व प्रत्यक्ष जीवनातील अनुभवातून आलेला विषयाचा व्यासंग क्वचित कुठे पाहावयास मिळतो. स्त्रियांच्या बाबतीत त्यांचे विचार अत्यंत उदार व दूरदर्शी होते. प्रत्येक स्त्रीला माता भगिनीच्या रुपात पाहून त्यांना आदर देण्याबरोबरच त्यांच्या कर्तृत्वावर विश्वास टाकून त्यांना संधी देणे ही काळाची गरज आहे. या विचारांना आपण आज आधुनिक म्हणतो पण समर्थांनी हे त्यांच्या काळातच प्रत्यक्ष कृतीतून अनेकवेळा दाखवून दिले आहे.

श्री समर्थांनी बारा वर्षे देशभर भ्रमंती केली होती. त्यांनी हा समाज अत्यंत बारकाईने पाहिला व अभ्यासला आहे. येथील लोकांची मानसिकता, गुण व दोष त्यांनी तेव्हाच हेरले होते. अनेक तऱ्हेचे लोक, त्यांचे खानपान, राहाणीमान, त्यांची संस्कृती हे सर्व त्यांनी निरीक्षण केले होते. त्यात स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार व त्यांच्या अब्रूची होणारी विटंबना, गुलामाप्रमाणे त्यांचे समाजातील स्थान हे श्री समर्थांना नक्कीच क्लेशदायक वाटले असणार. हे सर्व चित्र भयावह असेच होते. एखाद्या दगडासारखे काळीज असणाऱ्या व्यक्तीलाही हे पाहून पाझर फुटेल. त्यावेळी परकीय आक्रमणात देश जखडलेला होता त्यामुळे ते एक संकट होतेच पण इथेही अनेक रुढी - परंपरांमध्ये स्त्रियांवर अत्याचार होतच होते.

स्त्रियांनी सक्षम होणे, प्रतिकूल परिस्थितीतही लढण्याची हिंमत ठेवणे आवश्यक होते हे श्री समर्थांनी

ओळखले होते. स्त्रीला तिच्या शक्तीची जाणीव करुन देणे गरजेचे तर होतेच पण समाजालाही स्त्रियांचे आपल्या धर्मातील स्थान पुन्हा एकदा नीट दाखवणे गरजेचे होते, म्हणून रामदासी संप्रदायात त्यांनी स्त्रियांना महत्त्वाचे स्थान दिले.

त्या काळात अनेक संत होऊन गेले त्या वेळच्या समाजाच्या झालेल्या अवस्थेची त्यांना जाणीवही होती, परंतु रामदास स्वामी हे एक असे संत होते की, त्यांनी प्रत्यक्षपणे ठोस पावले उचलली.

श्री समर्थांच्या अनेक निर्णयातून हे दिसून येते की त्यांनी स्त्री शक्तीचा गौरव कशा पद्धतीने केला. संत वेणास्वामी या कोल्हापूर येथील एका ब्राह्मण कुटुंबातील. लहानपणीच त्या विधवा झाल्या. ज्या काळात विधवा स्त्रियांना अनेक बंधने होती, कुठल्याही गोष्टीचा अधिकार नव्हता त्या काळात समर्थांनी संत वेणास्वामी यांना मठाधिपती केले. कीर्तन करण्याची प्रेरणा व स्वातंत्र्य दिले. तसेच प्रत्येक वेळी पाठिशी राहून समाजाला ते मान्य करावयास लावले. समर्थांना त्यावेळी खूप विरोध झाला. वेणास्वामींना तर विष घालून मारण्याचा प्रयत्न झाला परंतू श्रीरामाच्या कृपेने त्या त्यातून बचावल्या. अशा पद्धतीच्या संकटांवर मात करत समर्थांनी स्त्रियांचा गौरव केला.

श्री समर्थ प्रत्येक रामनवमी उत्सवाच्या आधी निवडक शिष्य घेऊन भिक्षेसाठी जात असत. त्या काळात एखाद्या महत्वाच्या व्यक्तीला चाफळात ठेऊन उत्सवाची सर्व जबाबदारी त्याच्यावर सोपविली जात असे. एका वर्षी ही जबाबदारी संत वेणास्वामींच्यावर सोपवण्यात आली होती. उत्सवासाठी सगळ्या प्रकारची धान्ये निवडून ठेवणे, लोणची, चटण्या, सांडगे, पापड, मेतकुट या सर्व गोष्टी सिद्ध ठेवणे, समर्थांनी पाठवलेली भिक्षा कोठीघरात व्यवस्थित लावून ठेवणे अशी विविध कामे करावी लागत. अशा मोठ्या जबाबदरी देऊन समर्थांनी त्यांच्यातील नेतृत्व गुणास वाव दिल्याचे दिसते. वेणास्वामींच्या प्रमाणेच अक्कास्वामी व अंबिकाबाई यांनाही समर्थांनी मोठ्या जबाबदाऱ्या दिल्या. अक्कास्वामींनी समर्थांच्या निर्याणानंतर सज्जनगडाचा कारभार ३५ वर्षे पाहिला.

भारतीय इतिहासाच्या अत्यंत भयंकर अशा कालखंडात स्त्रियांच्या उद्धाराचा श्री समर्थांनी विचार केला आणि तो विचार कृतीत आणला. याची बरोबरी कशाशीच होऊ शकत नाही. स्त्रियांच्या उद्धाराचा, प्रगतीचा विचार करणारे संत म्हणून ते नेहमीच मोठे ठरतात.

## मध्यवर्ती संस्थेस देणगी

* श्री. शरदचंद्र झरेगावकर यांचेकडून रु. ११,०००/- यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ करीत असलेल्या सामाजिक कार्यास (दासनवमी) देणगीचा धनादेश देऊन संस्थेबद्दल आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त केली आहे. मध्यवर्ती मंडळास दिलेल्या या देणगीबद्दल आम्ही आभारी आहोत.

**९ एप्रिल गुढीपाडवा निमित्त समस्त सभासदांना हार्दिक शुभेच्छा.**
**नूतन संवत्सर सर्व सभासदांस सुख, समृद्धी,**
**उत्तम आरोग्याचे जावो ही प्रार्थना.**

# संलग्न संस्था वृत्त

**धुळे** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या महिला आघाडीच्या वतीने मकरसंक्रांतीच्या पर्वाच्या निमित्ताने महिलांसाठी तिळगुळ वाटप हळदीकुंकू व स्नेहमिलन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. गितांजली कुळकर्णी व सूत्रसंचालन डॉ. सौ. सुप्रिया कोरान्ने यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. गितांजली कुळकर्णी या होत्या. सौ. माधुरी रुद्र व सौ. सुचेता रुद्र यांच्या गीत गवळणीने कार्यक्रमात रंगत आणली. स्मिताताई जवखेडकर व जयश्री कुळकर्णी या प्रमुख अतिथींनी समयोचित मार्गदर्शन केले. या उपक्रमात मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे महिला सांस्कृतिक मंडळातर्फे दासनवमीनिमित्त समर्थ रामदास स्वामींना अभिवादन करण्यासाठी लालबाग परिसरातील पुरातन सारजाबाई दत्त मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्रीम. मीकाताई देशपांडे यांनी दासबोध अभ्यास आणि समर्थांचा धर्मप्रसार कार्य, बलोपासना प्रचार, दासबोध व मनाचे श्लोक यावर उत्तम निरुपण सादर केले. यावेळी महिला सांस्कृतिक मंडळाच्या कार्यकर्त्या यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**सोलापूर** : देशस्त ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या महिला शाखेतर्फे तिळगुळ समारंभ आणि महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य शाखेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर होते तर शुभदा देशपांडे यांचे भारतीय 'सणवारांचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान झाले.

आपल्या व्याख्यानात शुभदा देशपांडे कशशर्लीशशी विविध दाखले देत आपल्या सणांचे महत्त्व पटवून दिले. अध्यक्षीय भाषणात येळेगावकर यांनी सर्व समाजासाठी महिलांनी उपक्रम राबवावे असे आवाहन केले. यावेळी महिला शाखेच्या अध्यक्षा हेमा चिंचोळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

सुरूवातीला समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्राध्यापिका मधुरा वडापुरकर यांच्या गीत गायनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली प्राध्यापिका शुभदा कुलकर्णी यांनी प्रास्तावित केले. क्षितिजा गाताडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास स्मिता देशपांडे, यांच्यासह महिला शाखेच्या पदाधिकारी, मुख्य शाखेचे उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये, विजय कुलकर्णी, कार्यवाह श्याम जोशी, कोषाध्यक्ष सतीश पाटील आदी उपस्थित होते.

दासनवमी निमित्ताने देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूरतर्फे सौ. रत्नप्रभाताई शस्त्रबुद्धे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहस्रबुद्धे यांनी आपल्या कीर्तनातून राम नामाचे महत्व सांगत रामावतार हा सगळ्यात सुंदर अवतार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करुन आणि समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांतर्फे आणि महिला शाखेच्या अध्यक्षा हेमाताई चिंचोळकर यांच्या हस्ते सहस्रबुद्धे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कीर्तनानंतर समर्थांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच महाप्रसादाचे वाटपही करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष दत्ता आराध्ये, विजय कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश पाटील, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, शिरीष मंगरूळकर, शंकर कुलकर्णी यांच्यासह श्रोतुवर्ग उपस्थित होता.

* **दे.ऋ.ब्रा.चा कै. काकडे स्मृती पत्रकार पुरस्कार अश्विनी तडवळकर यांना जाहीर** : सोलापूर येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थतर्फे दरवर्षी देण्यात येणारा कल्पतरूकार कै. ल.गो. काकडे स्मृती पत्रकार

पुरस्कार यंदा दैनिक दिव्य मराठी सोलापूर आवृत्तीच्या वरिष्ठ बातमीदार अश्विनी तडवळकर यांना देण्यात आला. पाच हजार रुपये रोख संशोधन शिष्यवृत्ती, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण कार्यक्रम शनिवार दि.१७ फेब्रुवारी २०२४ रोजी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात (ॲम्फी थिएटर) सायंकाळी ६.०० वाजता संपन्न झाला.

**मोहोळ** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था मोहोळ तर्फे ५० वर्षांची परंपरा असलेला श्री रामदास नवमी उत्सव सप्ताह सोहळा माघ वद्य प्रतिप्रदा ते माघ वद्य नवमी, रविवार दि. २५.०२.२०२४ ते मंगळवार दि. ०५.०३.२०२४ या कालावधीत संपन्न झाला. रविवार दि. २५ ला प.पु. विनायक बुवा मोहोळकर यांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष वे.शा.सं. प्रा. श्री. बाजीराव जोशी यांच्या उपस्थितीत दिप प्रज्वलन व समर्थ प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

रोज पहाटे ५.३० वाजता रामफेरीचे नियोजन केले होते. ३५ ते ४० स्त्री, पुरुष व मुले सहभागी होते. मनाचे श्लोक, करुणाष्टके, राम भक्तीगीते, समर्थाचे अभंग व घोषणा यांनी फेरी उत्साहात पार पडत होती. दुपारी १ ते ४ दासबोध पारायण होत होते. सायंकाळी ६ वाजता प्रवचन सेवा होत असे. दासबोधाचे अभ्यासक व समर्थ चरित्र अभ्यासक यांची उद्बोधक प्रवचने संपन्न झाली. मोहळच्या श्री व्यंकटेश मंदिरात हा सोहळा पार पडला. मंदिर पताका, ध्वज, श्रीराम व श्री रामदास यांची भव्य चित्रे व विद्युत रोषणाई यांनी सुशोभीत केले होते.

५ तारखेला सकाळी १० वाजता पासुन, संस्थेचे सर्व सभासद व इतर भावीक उपस्थित होते. १२ वाजता समर्थ प्रतिमेवर पुष्पवृष्टी व आरती करून प्रसाद वाटप करण्यात आले. प्रवचनाच्या प्रारंभी समर्थाचा अभंग व शेवटी समर्थांचे पसायदान पद्मावती महिला भजनी मंडळा तर्फे गायले जात असे. १ फेब्रुवारी ते ५ फेब्रुवारी या चार दिवशी संस्थेचे १० सभासद प्रत्येक सभासदाच्या घरी जाऊन एक मनाचा श्लोक म्हणून समर्थ भिक्षा जमा करत व कार्यक्रम पत्रिका देऊन, कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन करीत. सर्वांच्या सहकार्याने व सदिच्छेने आणि श्री समर्थ कृपेने सप्ताह सोहळा आनंददायक उत्साहात संपन्न झाला. संस्थेचे संस्थापक सचिव श्री. जयेश आराध्ये यांनी सोहळ्याचे योग्य नियोजन केले.

**विलेपार्ले** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, विलेपार्ले येथे दि. १३ व १४ फेब्रुवारी २०२४ रोजी माघी श्री गणेश उत्सव साजरा करण्यात आला. दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता श्रींची स्थापना, विधिवत व पूजा व आरती करण्यात आली आणि संध्याकाळी ६.३० वा. श्री. हेमंत बर्वे यांचा षड्जपंचम प्रस्तुत 'गंधार' तर्फे मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम करण्यात आला. या




कार्यक्रमादरम्यान सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्री. दत्तात्रय मायाळू उर्फ राजदत्त यांचा त्यांना भारत सरकारने पद्मभुषण पुरस्कार दिल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच या कार्यक्रमादरम्यान विलेपार्ले संस्थेच्या महिला सदस्य सौ. तनुजा घोटीकर, सौ. ज्योती जोशी व श्रीमती आश्विनी नारविलकर यांचा त्यांनी आयोजित केलेल्या ग्राहक पेठेतील कामगिरीबद्दल श्री. राजदत्त यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. श्री. राजदत्त यांनी त्यांच्या सत्काराबद्दल संस्थेचे आभार मानताना मार्च, एप्रिल नंतर त्यांची दीर्घ मुलाखत देण्याचे कबूल केले. वयाच्या ९३ वर्षी श्री. राजदत्त यांचा उत्साह तसेच त्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल आम्हा सर्व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाला अभिमान आहे. श्री. राजदत्त यांना आम्ही निरोगी दीर्घ आयुष्य प्राप्त व्हावे अशी प्रभु रामचंद्र चरणी प्रार्थना करतो. या कार्यक्रमास १०० च्या वर सदस्यांची उपस्थिती होती.

* फेब्रुवारी महिन्यातील दि. ९, १० आणि ११ रोजी विलेपार्ले येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ येथे ग्राहक पेठ भरवण्यात आली होती. संस्थेच्या तळमजला आणि कंपाऊंड मिळून जवळपास ४५ स्टॉल्स लावण्यात आले होते. खामकर मसाले, लखनवी कुर्ते, ड्रेस, श्रीखंड, बासुंदी,ड्रेस मटेरियल, साड्या, ब्युटी प्रॉडक्ट्स, पर्सेस, तयार पीठे, चादरी, सुगंधी मेणबत्त्या, इमिटेशन ज्वेलरी, माथेरान चप्पल असे विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. तसेच आनंदवन येथील कारागिरांनी तयार केलेल्या वस्तुंचाही स्टॉल ठेवण्यात आला होता. सामाजिक बांधिलकी आणि आदिवासी बांधवांना प्रोत्साहन हा स्टॉल देण्यामागचा उद्देश होता. तसेच ४ अंध लोकांना आलेल्या ग्राहकांना फूट, हेड,नेक मसाज करण्यासाठी आपण जागा देऊ केली होती. त्यातून आलेल्या मिळकतीचा त्या लोकांनाच फायदा व्हावा हा एकमेव उद्देश होता.

या ग्राहक पेठेला लोकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला आणि परत कधी करणार अशी विचारणाही केली. परत केल्यावर आम्हाला बोलवा असेही सांगून संस्थेच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले आणि परत येण्याचे आश्वासनही दिले.

एकूणच ग्राहक पेठ यशस्वीरीत्या पार पडली आणि स्टॉल धारक आणि ग्राहक यांना योग्य तो फायदा आणि समाधान मिळाले यातच संस्थेला आनंद आहे.

**मुलुंड** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड तर्फे 'दासनवमी' निमित्त 'दासबोध पारायण' दिनांक - रविवार २५-२-२०२४ ते ५-३-२०२४ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. रविवार दिनांक २५-२-२०२४ रोजी सकाळी ९ वाजता 'दासबोध' ग्रंथ पुजन त्यानिमित्त पंचोपचार पुजा श्री.नंदकुमार तांबवेकर यांच्या हस्ते संपन्न झाली. ३० साधक सहभागी झाले होते. पारायण दरम्यान प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी (१ ते ४ थी) स्पर्धा शुक्रवार दिनांक १-३-२०२४ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. गट पहिला - (पहिली-दुसरी) पाठांतर स्पर्धा - रामभक्त हनुमान स्तोत्र (भीमरूपी महारुद...) गट दुसरा - (३-४थी )- स्पर्धा - रामकथा कथन. मुलांनी खूप छान प्रकारे व वेगवेगळ्या कथा प्रस्तुत केला. बक्षीस वितरण समारंभात संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.भगवान आडगावकर, महिला शाखा अध्यक्ष डॉ.सौ.प्रेरणा क्षीरसागर, इतर कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व मुलांना वही व राजगिरा चिक्की असा खाऊ देण्यात आला. दासनवमीच्या दिवशी मंगळवार दिनांक ५-३-२०२४ रोजी सौ.वसुंधरा क्षीरसागर यांचे 'प्रपंच व परमार्थ याविषयी समर्थांची शिकवण' याविषयी प्रवचन आयोजीत करण्यात आले होते. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष, विश्वस्त व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. प्रवचनानंतर प्रसाद वाटप करून पारायणाची सांगता झाली.

**बडोदा** : दासनवमीच्या निमित्याने बडोदे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळा तर्फे श्री रामदास स्वामींचे पूजन,आरती तसेच मनाच्या श्लोकाचे पठन व विशेष सौ.माधवीताई मोगरकर यांचे रामदास स्वामी व त्यांचे

व्यवस्थापन ह्या विषयावर प्रवचन झाले.एकूण ५० च्या वर उपस्थिती होती.कार्यक्रमानंतर प्रसाद देऊन कार्यक्रम आनंदित वातावरणात संपन्न झाला.

**कल्याण** : दि. १० मार्च २०२४ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याण संघ येथील मैत्रीणी – सदस्यांसाठीचा जागतिक महिला दिन खूप उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सौ. आश्विनी क्षिरसागर व सौ. रसिका धर्माधिकारी यांनी प्रवेशद्वारावर सुंदर रांगोळी रेखाटली होती. हळदी, कुंकू आणि चहापानाची व्यवस्था सौ. रसिका धर्माधिकारी यांनी सांभाळली. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दिप प्रज्वलाने संस्थेच्या अध्यक्षा सौ. सरिता कुलकर्णी यांच्या हस्ते झाली. या प्रसंगी श्रीम. सुजाता अनखिंडी यांचा सत्कार करण्यात आला. जागतिक महिला दिना संबंधात आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाबद्दल सौ. शुभांगी कुलकर्णी यांनी माहिती सांगितली. संस्थेचे अध्यक्ष श्री. सुरेश कुलकर्णी, सौ. मुग्धा घाटे, श्री. विजय चाव्हरे, उपाध्यक्षा वैजयंती पतकी, वृषाली वरुडकर तसेच महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

**मुंबई** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, दादर सांस्कृतिक मंच यांच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. संगीतकार राहुल रानडे, अभिनेता कवी किशोर कदम (सौमित्र), अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी बहारदार कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तरा मोने यांनी केले. समर्थ व्यायाम मंडळाचे अध्यक्ष श्री. उदय देशपांडे, श्री. नितिन सरदेसाई, श्री. प्रभाकर कुलकर्णी, सीए. श्रीनिवास गोगटे, श्री. मिलिंद सरदेशमुख, ज्येष्ठ गायिका सौ. शशी नांदेडकर यांची प्रमुख उपस्थितीसह मुंबईकरांच्या प्रचंड उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

❋ **दासनवमी** : मध्यवर्ती संस्थेच्या लक्ष्मीनारायण बागेतील सभागृहात दासनवमी उत्सव मोठ्या उत्साहात




Protect Capital & Create Wealth.....

JAYANT DESHMUKH

B.COM. CAIIB DBM

Insurance & Investment Consultant

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201

Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

पार पडला. संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, श्री. विवेक देशपांडे, व्यवस्थापक श्री. विकास माने तसेच बहुसंख्य सदस्य कार्यक्रमास उपस्थित होते. यानिमित्त श्री. व सौ. शरदचंद्र झरेगावकर यांच्या उपस्थितीत समर्थांची पूजा करण्यात आली.

* **शिवजयंती उत्सव** : दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी मध्यवर्ती संस्थेच्या सभागृहात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शिव प्रतिमेला पुष्पहार श्री. मिलिंद सरदेशमुख यांच्या हस्ते घालण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची विस्तृत माहिति उपस्थितांना श्री. सरदेशमुख यांनी करून दिली. श्री. विवेक देशपांडे, श्री. चारुहास हंबीरे, श्री. विकास माने, कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

**कल्याण : दासनवमी निमित्ताने दासबोध वाचन व समारोप प्रवचन –** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण व राम मंदिर संस्थान, काळा तलाव, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दासबोध वाचन संस्थेच्या कार्यालयात २८ नोव्हेंबर ते ०४ मार्च २०२४ या काळात आयोजित करण्यात आले. या वाचनात दररोज सात ते दहा सदस्यांनी भाग घेतला. शेवटच्या दिवशी श्रीराम मंदिर संस्थान काळा तलाव येथे समर्थ भक्त अलकताई मुतालिक यांच्या सुश्राव्य प्रवचनांने वाचनाचा समारोप झाला. त्यांनतर रामाची आरती, दासबोध आरती, कल्याण करी रामराया मंत्रपुष्पांजली नंतर चहापान व प्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी बहुसंख्येने समर्थ भक्त व सदस्य उपस्थित होते.

**नाशिक** : देशस्थ ऋग्वेदी संस्था नासिक यांच्या वतीने जिल्हास्तरीय भव्य खुली बहुभाषिकीय भजन स्पर्धा घेण्यात आली सुरुवातीला मध्य विधान सभेच्या आमदार सन्माननीय सौ देवयानी फरांदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी त्यांच्या समवेत संस्थेचे अध्यक्ष मुकुंदराव कुलकर्णी कार्याध्यक्ष सुहास पाटील कार्यवाह मकरंद सुखात्मे महिला शाखा कार्याध्यक्ष सविता कुलकर्णी कार्यवाहक सौ सुजाता करजगीकर उपस्थित झाले नंतर परीक्षकांचाही सत्कार करण्यात आला.

मान्यवरांच्या हस्ते लकी ड्रॉ काढून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली या भजन स्पर्धेत एकूण २५ भजनी मंडळांनी भाग घेतला होता स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली.

या स्पर्धेचा निकाल स्पर्धेचे सहप्रायोजक रेणुका चेन चे संचालक कृष्णा दुसानीस व प्रमुख पाहुणे गायक पंडित आशिष रानडे यांच्या हस्ते बक्षीस करण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक रुपये ५००१ व ट्रॉफी संत ज्ञानेश्वर मुक्ताई बाल भजनी मंडळ मराठा हायस्कूल नाशिक

द्वितीय क्रमांक ३००१ व ट्रॉफी ब्रम्हचैतन्य भजनी मंडळ सोमवार पेठ नासिक

तृतीय क्रमांक २००१ व ट्रॉफी रेणुका देवी भजनी मंडळ चांदवड जिल्हा नाशिक

उत्तेजनार्थ १००१ व प्रशस्तीपत्रक वरद भजनी मंडळ महात्मा नगर नाशिक

तसेच सर्व भजनी मंडळांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेचे आकर्षण पंडित आशिष रानडे यांनी आपल्या सुरेल आवाजात सर्वांसाठी माझा भाव तुझे चरण अभंग सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. बक्षीस वितरण समारंभ संस्थेचे अध्यक्ष श्री मुकुंद कुलकर्णी कार्याध्यक्ष श्री सुहास पाटील कार्यवाह श्री मकरंद सुखात्मे महिला शाखा कार्याध्यक्ष श्रीमती सविता कुलकर्णी सातपूरकर, महिला शाखा कार्यवाह सौ सुजाता करजगीकर श्री कृष्णा दुसाने हे मान्यवर उपस्थित होते

यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी विश्वस्त व कार्यकारणी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला : समावेशकता आणि सक्षमता

**सौ. वीणा आशुतोष रारावीकर** (मो. : ९८१९९८२१५२)

प्रत्येक दिवस साजरा करण्याचा सध्याचा काळ. आठ मार्च, आंतरराष्ट्रीय महिला दिन. महिलांचा सन्मान करण्याचा, त्यांच्या उत्कर्षाचा, त्यांच्या उर्जेला, नारीशक्तीला प्रणाम करण्याचा दिवस. सर्व जगभर महिलांच्या कार्यक्रमांची रेलचेल असते. अगदी गूगलपासून ते गल्लीपर्यन्त. यासाठी गूगल आपल्या डूडलमधून, तर अनेक कंपन्या आपल्या महिला कर्मचार्यांसाठी खास कार्यक्रम आखून, बहुतेक लोक आपापल्या ग्रुपमधील सर्व महिलांना अभिनंदन करून, अनेक ठिकाणी महिलांना भेटवस्तू किंवा या विषयावरची व्याख्याने आयोजित करून सगळीकडे या दिवसाचा समारंभ चालू असतो. हा दिवस सुरू व्हायला १९०८ साली न्यूयॉर्कमध्ये झालेल्या रॅलीची पार्श्वभूमी आहे. याचाच अर्थ हा दिवस सुरू होऊन शंभर वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. जेव्हापासून दिवसाला सणाचे महत्व येऊ लागले, तेव्हापासून आपल्या इथे त्याचा सर्वदूर प्रसार होऊ लागला. संयुक्त राष्ट्राने ८ मार्च १९७५ रोजी महिला दिनाला मान्यता दिली आणि दरवर्षी स्पेशल थीम सुरू केली. यावर्षीच्या महिला दिनाची संकल्पना आहे 'महिलांमध्ये गुंतवणूक करा : प्रगतीचा वेग वाढवा'; अर्थात Invest In Women: Accelerate Progress. 'समावेशकता प्रेरणा'; असा त्याचा आहे. एक महिला शिकली की, ती सारे कुटुंब साक्षर करते, संस्कारक्षम करते, या महात्मा फुलेंच्या वचनाला अनुसरून ही संकल्पना आहे.

आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहेत. आपल्या कर्तृत्त्वाने त्या विविध क्षेत्रांत गगनभरारी घेत आहेत. महिलांच्या हक्कांचं रक्षण आणि स्त्री-पुरुष समानता या दृष्टीने जागतिक महिला दिनाला विशेष महत्त्व आहे. स्त्री-पुरुष समानतेची सुरवात घरातून होणे आवश्यक आहे. अनेक महिला कुटुंबासाठी, मुलांसाठी आपल्या स्वप्नांना मुरड घालून अनेक गोष्टींचा त्याग करतात. आत्ताच्या काळात एखादे वडील आपल्या बाळाला सांभाळण्यासाठी नोकरी सोडतात. असे एखादे अपवादात्मक उदाहरण देखील पाहायला मिळते. समानतेच्या दृष्टीने टाकलेली अशी पाऊले समाजात दिसत आहेत.

पिढ्यानपिढ्या मुलगी म्हणून मुलींवर जे संस्कार होतात, त्यातून तिच्यावर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकले जाते. जबाबदारीचे ओझे महिलांच्या खांद्यावरून उतरवायला समाजाची मानसिकता बदलायला हवी आहे. आपल्याला समानतेने वागवले जात नाही, आपल्याला खालची पातळी दाखवली जाते, आपल्यावर अन्याय होतो आहे याची जाणीव देखील नसणार्या काही महिला आहेत. आपल्यावरील या अन्यायाची जाणीव स्त्रियांना होणे महत्वाचे आहे. अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो, हे सत्य विसरून चालणार नाही.

तसेच हल्ली मुली शिक्षण घेऊन आर्थिक स्वातंत्र्य उपभोगत आहेत. पण मिळालेल्या शिक्षणाचा गैरफायदा घेत स्वच्छंदी जीवन जगणे किंवा नको त्या व्यसनांमध्ये मुलांशी बरोबरी करणे, हे टाळले पाहिजे. विचार स्वातंत्र्याची दिशा आणि निर्णय घेण्याची क्षमता महिलांना दिली गेली पाहिजे. याला समानता म्हणता येईल. बाहेरच्या आकाशाला गवसणी घालताना नवीन तंत्रज्ञानाच्या हल्ल्यापासून स्त्रियांनी सजग राहिले पाहिजे.

आयुष्याच्या जीवन-रंगमंचावर स्त्री विविध भूमिका बजावत असते. त्या भूमिका निभावतांना ती आपली जबाबदारी कसोशीने पार पाडत असते. त्याचबरोबर स्वतःचे आरोग्य, स्वतःचा आनंद, स्वतःसाठी वेळ अशा गोष्टींकडेही तिने लक्ष दिले पाहिजे.

समाजसंस्थेचा कणा म्हणजे ही 'महिला' संस्था - आई, पत्नी, बहीण, सखी, मुलगी अशा विविध

नात्यांतून आपल्या परिवाराची आणि समाजाची जडणघडण करत असते. स्नेहबंधातून समाजवस्त्र विणत असते. ती अधिकाधिक सक्षम, समर्थ, परिपक्व झाली पाहिजे. कुटुंबाची, समाजाची आणि त्याचबरोबर देशाची प्रगती यात आहे. महिला दिनाच्या निमित्याने आपण सर्वांनी प्रयत्नशील राहण्याचा संकल्प केला पाहिजे.

## जागतिक महिला दिन - ८ मार्च

**संगीता कुलकर्णी** (मो. : ९८७०४५१०२०)

जागतिक महिला दिन अर्थात स्त्रीत्वाचा उत्सव. महिलांच्या सन्मानाचा त्यांच्या उत्कर्षाचा दिवस म्हणजे महिला दिन...

महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी आठ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

अठ्ठावीस फेब्रुवारी न्यूयॉर्क येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला असला तरीही सन १९१० च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषेदत मांडलेल्या सुचनेनुसार आठ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला. भारतीय परंपरेत स्त्रियांना व स्त्रीशक्तीला समजून घेताना तिची कलात्मकता, तिचे आधिपत्य आणि तिची रौद्र शक्ती यांचा विचार केला गेला. स्त्री पुरुषापेक्षा शरीराने कमजोर असली तरी वेळप्रसंगी तिच्याजवळ असलेल्या आंतरिक व मानसिक शक्तीचे रूपांतर प्रचंड स्फोटात होऊन शेवटी तीच जिंकणार हे नक्की असते. भारतीय परंपरेत स्त्रीला सर्व अधिकार मिळावेत हे जसे सांगितले आहे तसेच तिला वेदकालीन काळापासूनच शिक्षणाचा अधिकार मिळाला होता.

मुलगी म्हणून तिला तिच्या वडिलांच्या संपत्तीत अधिकार होता तर पत्नी म्हणून तिला पतीच्या संपत्तीत अधिकार होता. समाजात प्रथम स्त्रीला मान देण्याची पद्धत होती.

महिलांमध्ये अपार शक्ती आणि क्षमता आहेत. सगळ्याचं क्षेत्रात त्यांनी आपली कीर्ती स्थापित केली आहे. आपल्या अथक परिश्रमाने, अद्भुत साहसाने तसेच आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर जगाच्या विश्वपटलावर स्वतःची अशी एक वेगळीच ओळख बनविण्यात ती यशस्वी झालेली आहे. मानसिक संवेदना, करुणा, वात्सल्य अश्या अनेक भावनांनी परिपूर्ण असलेल्या स्त्रियांनी जग निर्माण करण्यात आपले मोलाचे योगदान दिलेले आहे. तरीही स्त्रीला तिच्या मनासारखं वागण्याचा अधिकार नाही. तिच्या वाटेत प्रचंड अडचणी आहेत. तरीही ती अजून लढते आहे. इतरांना प्रेरणा देत आहे.

आजची स्त्री खरचं खूप पुढे निघून गेलेली आहे. आज ती प्रत्येक क्षेत्र पादाक्रांत करताना दिसते आहे. चूल आणि मूल करणारी स्त्री आज सगळ्या त्या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळून आर्थिक क्षेत्रातही खंबीरपणे उभी आहे... पण..

खरचं ती स्वतंत्र आहे का? असा प्रश्न पडतोच की ... पुरुषांच्या विखारी नजरा, बालिके पासून वृद्धांपर्यंत अत्याचार होताना दिसतात.. गर्दीत, समाजात, शाळेत, नातेवाईकांत आज एकटी स्त्री असेल तर ती खरोखरीच सुरक्षित आहे का? नोकरीच्या ठिकाणी लोकल मध्ये, अपरात्री प्रवास करणारी स्त्री सुरक्षित आहे?..तर...नाही हेच उत्तर येइल..! ही परिस्थिती अगदीखेड्यापाड्यापासून मोठ्या शहरांपर्यंत एकच आहे.. ज्यांना घरातून साथ आहे भक्कम आधार आहे त्या सोडल्या तर विधवा, एकाकी रहाणाऱ्या स्त्रिया, बालिका, अनाथ मुली आहेत अशा स्त्रियांचे स्त्रीत्व नक्कीचं धोक्यात आहे... पण ही सत्य परिस्थिती आहे.. न बदलणारी..

ज्या स्त्रिया याही परिस्थितीत समाजात खंबीरपणे न डगमगता ताठ मानेने उभ्या आहेत ... सलाम त्या दुर्गेला.. !

अनेक महान स्त्रिया आपल्या भारताला मिळाल्या आहेत. भारतासारख्या शक्तिशाली देशाची कमान इंदिरा गांधी, प्रतिभा पाटील यांसारख्या स्त्रियांनी संचालित केले तर लोकसभा अध्यक्ष त्याचबरोबर अनेक राज्यांच्या महिला मुख्यमंत्री आजही आपल्या कार्याची यशस्वीरित्या अंबलबजावणी करताना आपल्याला दिसत आहेत..

महादेवी वर्मा, महाश्वेता देवी, अरूणा ढेरे, शांताबाई शेळके, दुर्गा भागवत, वसुधा पाटील, कमल देसाई, योगिनी जोगळेकर, कमलाबाई टिळक, मालतीबाई दांडेकर, सुमती क्षेत्रमाडे, प्रतिमा जोशी, तारा भवाळकर इ. अश्या अनेक महिलांनी देखील साहित्य क्षेत्र उत्कृष्ट रचनांनी सुशोभित केलेले आहे आणि आजही करत आहेत.. तसेच स्त्रिया ह्या ट्रेन, विमान याबरोबरच ऑटो रिक्षा देखील सफलतापूर्वक चालवत आहेत.. चालवताना दिसत आहेत.. सुनीता विलियम्स आणि कल्पना चावला या अंतरीक्ष जगाच्या शान मानल्या जातात. प्रथम रेल्वे गाडी चालवणारी महिला सुरेखा यादव ह्या फक्त भारताची नाही तर आशिया खंडातील पहिली रेल्वे महिला चालक आहेत.. अश्या अनेक अनेक स्त्रिया आपापल्या क्षेत्रात आपले नाव लौकिक करत आहेत.

आज महिला फेसबुक व अन्य सोशल नेटवर्किंग द्वारे आपल्या गोष्टी सांगत आहेत. देशभरच्या बातम्याची खबरबात ठेवत आजची महिला घर आणि ऑफिस या दोन्ही गोष्टी योग्य प्रकारे सांभाळत आहे इतकच नाही तर यशस्वीरित्या सांभाळताना ही दिसत आहेत...

अत्याचार झालेली स्त्री किंवा ज्या घरी स्त्रीवर अतोनात अत्याचार घडलेले असतात किंवा घडत असतात तसेच आजूबाजूला स्त्री वर होणारा अन्याय, समाजाच्या वाईट नजरा या कारणाने तर आज मुलींच्या जन्मावरचं प्रश्न चिन्ह उमटले नसेल ना? म्हणून तर स्त्री भ्रूणहत्या घडत नसतील ना? असा प्रश्न मात्रं माझ्या मनात आल्या वाचून राहत नाही हे नक्कीचं..

भारतीय परंपरेचा थोडा जरी अभ्यास केला तर जागतिक महिला दिनाचे महत्त्व अधिक कळून येईल आणि हा दिवस साजरा केल्याचे सार्थक होईल.

मनापासून स्त्रीचा अधिकार स्वीकारला, तिचे महत्त्व ओळखले तरच जागतिक महिला दिनाचे खरे सार्थक होईल असे मला मनापासून वाटते..

## वधू पाहिजे

* **शशांक सदानंद धामणकर.** जन्म तारीख : २८.०८.१९८३, जन्म वेळ : सकाळी १०.२०, शिक्षण : B. E. Mechanical, नोकरी : B. E. Mechanical वार्षिक उत्पन्न : ९.५ लाख, ब्राह्मण पोटशाखा : कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र : आग्नरस, रक्तगट : $O^{+ve}$, उंची : ५.८, वर्ण : सावळा, जन्म स्थळ : गोरेगाव (मुंबई), बांधा : मध्यम, जन्म-लग्न कुंडली : रास : मेष, गण : देव, नाडी : आद्य, चरण : प्रथम, गोत्र : आग्नरस, नक्षत्र : अश्विनी, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : श्री. सदानंद विश्वनाथ धामणकर, संपर्क क्रमांक : ९८९३६२७३०२ / ९२७०९९५१६३ / ७३७८३०७२७०, अपेक्षा : अनुरुप, पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण शाखेची चालेल, नोकरीस प्राधान्य.
* **पुष्कर दिलीप मेहुणकर.** जन्म तारीख : ०८.०१.१९९०, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : हरीतस, उंची : ६.१, वर्ण : गोरा, शिक्षण : १२ वी पास (बी.सी.ए. दुसरे वर्ष), व्यवसाय : शेअर मार्केट, डे ट्रेडींग, वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख, अपेक्षा : मनमिळावु, नोकरी असलेली चालेल, संपर्क क्रमांक : ९८६९४१३०८६, ९८६९४६९१६१.

## वर पाहिजे


※ **तेजस्विनी अशोर कोटलगी**. जन्म तारीख : ०१.०९.१९९१, शिक्षण : P. G. Diploma Mass Comm., नोकरी / व्यवसाय : फोटोग्राफी, clothig, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : काश्यप, रक्तगट : $B^{+ve}$, उंची : ५.५, वर्ण : गोरा, रास : वृषभ, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : अशोक कोटलगी, घरचा पत्ता : ७, लक्ष्मी भुवन, चितळे पथ, पोतृगीज चर्च शेजारी, दादर, मुंबई ४०००२८, संपर्कासाठी दूरध्वनी : ९९६७८४८१०६, अपेक्षा : मुंबई शहर स्थायिक, आधुनिक विचार सरणीचे कुटुंब, शाकाहारी, दिसायला देखणा, वयातील अंतर ३ पर्यंत.

## सुधा मूर्तींचे अभिनंदन



सौ. सुधा मूर्ती यांची मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राज्यसभेवर मनोनित सभासद म्हणून नेमणूक केली. उत्तम लेखिका, विदूषी, समाजसेविका म्हणून सुधाताईंची ओळख आहे. एवढे ऐश्वर्य असून सुध्दा अतिशय साधी राहणी ही त्यांची विशेषतः आहे. त्यांच्या ज्ञानाचा आणि विपुल अनुभवाचा राज्यसभेस नक्कीच रचनात्मक आणि गुणात्मक लाभ होईल यात शंका नाही. राज्यसभा सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल सुधाताईंचे अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन.

## मनोहर जोशी सर यांना भावपूर्ण श्रद्धांजली



२३ फेब्रुवारी रोजी मनोहर जोशी सरांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने पी. डी. हिंदूजा इस्पितळात वयाच्या ८६ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने समस्त सहृदय जणांना हळहळ वाटणे सहाजिकच. अत्यंत गरिब कुटुंबात जन्मलेले मनोहरपंत अभ्यासात हुषार, प्रामाणिक, मेहनती आणि मदतीस सदैव तत्पर. आपला अगदी जवळचा आप्तेष्ठ गेल्याची भावना बहूदा सर्वांस झाली आहे.

त्यांचा जन्म २ डिसेंबर १९३७ रोजी नांदवी, जिल्हा रायगड येथे एका सामान्य कुटुंबात झाला. आपल्या हुषारी आणि कुशाग्र बुध्दीने उच्चशिक्षण प्राप्त केले, पुढे मुंबईत स्थायिक झाले. तत्पश्चात त्यांचा संपर्क हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय श्री. बाळासाहेब ठाकरे ह्यांच्याशी झाला. १९६६ मध्ये शिवसेना स्थापनेपासूनच त्यांचा शिवसेनेशी संबंध होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पदापासून विविध पदे भुषवित ते लोकशाही व्यवस्थेतील सर्वोच्च स्थान म्हणजे लोकसभेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. विविध प्रसंगी त्यांनी आपल्या बुध्दीचातुर्याने लोकसभेत निभावून नेले. कोहिनूर इन्स्टिट्यूटचे संस्थापक होते. युवकांचा कौशल्य विकास हा त्यांचा ध्यास होता. प्रकृती अस्वास्थासव ते बऱ्याच पदापासून दूर राहिले. तशाच अवस्थेत त्यांचे २३ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे सरांना विनम्र श्रध्दांजली.

# SHRI YASH TOURS

Plot No.41, Kalyan Road,
Dombivli (E) 421 201
Maharashtra State

आयोजक - श्रीकांत पाटसकर CELL : 9819148002

SPECIALIZED : PACKAGED TOURS ALL OVER INDIA INSTANT HOTEL BOOKING TOURS ALL OVER INDIA & SOUTH EAST ASIA, AIR TICKETS

E-Mail : shriyashtours04@gmail.com

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | |
|---|---|
| राजस्थान, (मारवाड) , जयपुर,जोधपूर, पुष्कर व ओसियन वाळवंट | मार्च १२ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २८,००० + विमान |
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, बडोदा, गरूडेश्वर व पोयचा ( स्वामी नारायण मंदिर) | मार्च २१ — ३ रात्र<br>खर्च प्र.रू. १३,००० + विमान |
| काश्मीर - श्रीनगर, पहलगाग, सोनमार्ग, - गुलमर्ग व कारगील | एप्रिल १७ — ७ रात्र<br>खर्च प्र. रू. ३३,०००+ विमान |
| दार्जिलींग, गंगटोक, पेलिंग | मे १० — ६ रात्र<br>खर्च प्र. रू. ३३,००० + विमान |
| हिमालयातील ४ धाम<br>यमनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ आणि हरीद्वार व हृषिकेश | मे २७ — ११ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. ४५,००० + विमान |
| हिमालयातील २ धाम<br>केदारनाथ, बद्रीनाथ, हरीद्वार व हृषिकेश | जून ३, १५ — ८ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. ३२,००० + विमान |
| हिमालयातील २ धाम<br>केदारनाथ, बद्रीनाथ व व्हॅली ऑफ फ्लॉवर | जुलै २८ — १० रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. ४०,००० + विमान |
| काशी, प्रयाग व अयोध्या | ऑगस्ट २०,२७<br>सप्टेंबर २०,२७ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २५,००० + विमान |

सुचना - ए.सी. हॉटेल वास्तव्य (Twins Sharing ) , ए.सी. बस प्रवास
- सकाळी नाश्ता व रात्रीचे भोजन, स्थळदर्शन व स्थळ मार्गदर्शक, प्रवेश शुल्क इ. सहल खर्चात समाविष्ट.
- जी.एस.टी. टॅक्स स्वतंत्र द्यावा लागेल.



*With*
*Best*
*Compliments*
*From*

S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**
Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565


FE
BEST BANKS AWARDS
IndusInd Bank
THE ULTIMATE
SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive Interest Rates
on Savings Account and Fixed Deposits
VIDEO Branch
Face-to-face banking anytime, anywhere
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
GET UP TO 20% OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank
*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## श्रीरामदास नवमी सप्ताह सोहळा, मोहोळ



Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH